# कुलाबा-सिप्झ मेट्रो-३मुळे पावसाळ्यात पाणी तुंबणार नाही

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी)-पावसाळ्यात कुलाबा-सिप्झ मेट्रो ३ च्या कामामुळे यंदा शहरात पाणी तुंबून नागरिकांची गैरसोय होणार नाही. मेट्रोच्या कामामुळे पाणी तुंबू नये म्हणून कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांबाबत मेट्रोचे सर्व अभियंते आणि कंत्राटदारांना योग्य निर्देश दिले असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने स्पष्ट केले आहे.

मेट्रो-३ च्या सर्व पॅकेजचे अधिकारी व मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांनी मेट्रोच्या बांधकामस्थळांना संयुक्त भेटी देऊन मान्सूनपूर्व कराव्या लागणाऱ्या कामांचा कृती आराखडा तयार केला आहे. त्यानुसार पालिकेच्या मार्गदर्शनाखाली मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अभियंत्यांनी आणि कंत्राटदारांनी मान्सूनपूर्व कामाला सुरुवात केली आहे. सर्व कामे प्रगतिपथावर असून पावसाळा सुरू होण्यापूर्वी ती कामे पूर्ण होतील. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या स्वच्छ करणे, त्यातील गाळ काढणे तसेच कॅच पिटस् बांधणे अशी कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच पावसाळ्यात वाहतुकीमध्ये अडथळा येऊ नये यासाठी दिशादर्शकांची पुन्हा रंगरंगोटी करणे, बॅरिकेडस् स्वच्छ करून दृश्यमानता वाढवणे, कामाच्या आजूबाजूचे रस्ते सुस्थितीत ठेवणे यासारखी कामे युद्धपातळीवर चालू असल्याची माहिती एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी दिली.

